'A' Grade
NAAC Re-Accredited
(4 th Cycle)

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**





**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**


**विद्यापीठाव्दारे आयोजित करण्यात येणाऱ्या उन्हाळी तसेच हिवाळी परीक्षांच्या उत्तरपत्रिका बंडल पॅकींग प्रक्रियेत वारंवार आढळून येणाऱ्या त्रुटींबाबत.**

**परिपत्रक क्र. ४४/२०२६**

**संदर्भ :- १.विद्यापीठाचे दि.२४/०४/२०२६ रोजीचे पत्र**
**२. परीक्षा व मूल्यमापन ठराव क्र. प.मू.मं. १२/२०२६ दि.२२/०५/२०२६**

विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उन्हाळी तसेच हिवाळी परीक्षांदरम्यान विविध महाविद्यालयांकडून प्राप्त होणा-या उत्तरपत्रिकांच्या बंडल पॅकिंग करतांना त्यामध्ये वारंवार विविध प्रकारच्या त्रुटी आढळून येत असल्याबाबत विद्यापीठाने यापूर्वी संबंधित महाविद्यालयांना, संदर्भांकित १ वर नमूद पत्रान्वये उत्तरपत्रिकांचे बंडल पॅकींग बाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे:-

१. उत्तरपत्रिकांच्या बंडलवर नमूद केलेले विषय व प्रत्यक्षात उत्तरपत्रिकांच्या बंडल मध्ये आढळून येणाऱ्या विषयांमध्ये सुसंगती असावी.
२. कनिष्ठ पर्यवेक्षकाने परीक्षा कक्षात विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेवर नमूद केलेला तपशिल योग्य भरला आहे की, नाही याची खातरजमा करुन कनिष्ठ पर्यवेक्षक (Junior Supervisor) यांचा JSR अहवाल परिपूर्ण भरुन प्रत्येक बंडलसोबत न चुकता जोडावा.
३. उत्तरपत्रिकांचे बंडल पॅकींग करतांना वरिष्ठ पर्यवेक्षक (Senior Supervisor) व डिस्पॅच क्लर्क यांनी योग्य तपासणी करावी.
४. NEP-२०२० अंतर्गत आंतरविद्याशाखीय (Inter disciplinary) विषयांच्या विषयनिहाय उत्तरपत्रिका स्वतंत्रपणे बंडलमध्ये पॅक करणे.
५. काही विषयांचे नावात साम्य असले तरी विद्यापीठ परीक्षा विभागाकडून त्यांना वेगवेगळे Unique Code देण्यात आलेले आहेत. अशा प्रकरणात केवळ विषयाचे नाव समान असल्यामुळे उत्तरपत्रिका एकाच बंडलमध्ये पाठवू नयेत, संबंधित विषयांचा Unique Code व Computer Code न तपासून स्वतंत्र बंडलमध्ये उत्तरपत्रिका पाठविणे.

**वरीलप्रमाणे सुचना देऊन देखील खालीलप्रमाणे प्रमुख त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत:-**

१. उत्तरपत्रिका बंडलमध्ये चुकीचे विषय / पेपर समाविष्ट असल्याचे आढळणे.
२. बंडलवर नमूद केलेले विषय व प्रत्यक्षात उत्तरपत्रिकांच्या बंडल मध्ये आढळून येणाऱ्या विषयांमध्ये विसंगती असणे.
३. कनिष्ठ पर्यवेक्षक (Junior Supervisor) यांचा JSR अहवाल अपूर्ण अथवा चुकीचा भरणे.
४. NEP-२०२०अंतर्गत आंतरविद्याशाखीय विषयांच्या उत्तरपत्रिका चुकीच्या बंडलमध्ये पॅक करणे.
५. समान विषय नाव असलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका एकत्रित बंडलमध्ये समाविष्ट करणे.
६. संबंधित विषयांचा Unique Code व Computer Code न तपासता उत्तरपत्रिका पाठविणे.
७. वारंवार सुचना देऊनही बंडल तयार करताना विद्यापीठाच्या सूचनांचे पालन न करणे.

...२

वरील त्रुटींमुळे होणारे **दुष्परिणाम : -**

- मूल्यमापन प्रक्रियेमध्ये विलंब होत असतो,
- ऑन स्क्रीन डिजिटल मूल्यमापन प्रणाली चुकीचे स्कॅनिंग व मूल्यमापन होण्याची शक्यता निर्माण होते.
- निकाल प्रक्रियेमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होऊन निकाल प्रक्रियेस विलंब होतो.
- विद्यापीठाच्या परीक्षा व्यवस्थेवर व कार्यावर अतिरिक्त भार पडतो.

वरील अनुषंगाने विचारविनिमय करण्यासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दिनांक २२/०५/२०२६ रोजी झालेल्या सभेत विषय सादर केला असता, सदर बाबींची परीक्षा व मूल्यमापन मंडळाने गांभीर्याने दखल घेतली असून, ठराव क्र. प.मू.मं. १२/२०२६ अन्वये अशा त्रुटींची तपासणी करून मा.कुलगुरू महोदयांना अहवाल सादर करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

**समितीचे कार्यक्षेत्र पुढीलप्रमाणे राहील :-**

- उत्तरपत्रिका बंडल, कनिष्ठ पर्यवेक्षकांचे अहवाल या संदर्भात आढळून आलेल्या त्रुटींची सविस्तर तपासणी करणे.
- संबंधित महाविद्यालय / परीक्षा संबंधित काम पाहणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांची समितीपुढे सुनावणी घेणे.
- त्रुटी होण्यामागील कारणमीमांसा निश्चित करणे.
- भविष्यात अशा त्रुटी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना व शिफारशी सुचविणे.
- चौकशी पूर्ण करून सविस्तर अहवाल मा.कुलगुरू महोदयांना सादर करणे.

समितीद्वारा उत्तरपत्रिकांच्या गठ्ठे व कनिष्ठ पर्यवेक्षकाचे अहवाल संदर्भात वारंवार आढळून येत असलेल्या गंभीर त्रुटींच्या केसेस काढून अशा महाविद्यालयांतील संबंधितांना समितीपुढे बोलाविण्यात येणार आहे.

समितीकडून सुनावणीसाठी बोलावण्यात आल्यास, आवश्यक ती कागदपत्रे व माहिती उपलब्ध करुन देऊन समितीस पूर्ण सहकार्य करावे. तपासणीदरम्यान महाविद्यालय तसेच संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचा निष्काळजीपणा अथवा नियमभंग आढळून आल्यास, विद्यापीठाच्या प्रचलित नियम, अधिनियम, अध्यादेश व परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या निर्णयानुसार संबंधितांविरूध्द योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात येईल, कृपया याची अत्यंत गांभीर्याने नोंद घ्यावी.

सर्व महाविद्यालयांनी परीक्षेची प्रक्रिया गांभीयाने घेऊन उत्तरपत्रिका बंडल तयार करताना विद्यापीठाच्या सूचनांचे व नियमांचे काटेकोर पालन करुन परीक्षांची निकाल प्रक्रिया त्रुटी विरहित व कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

**( प्रा. योगेश ना. पाटील )**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र.कबचौउमवि/७-आय/२०८६ /२०२६
दि.०६/०७/२०२६

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असलेल्या
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

**प्रत माहितीसाठी** :
(१) मा. कुलगुरू महोदय, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
(२) मा. प्र-कुलगुरू महोदय, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
(३) उपकुलसचिव (विज्ञान व शिक्षणशास्त्र, तंत्रज्ञान, औषधीनिर्माण, आर्किटेक्चर, मानवविज्ञान आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा), क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
(४) उपकुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळ (गोपनीय पूर्वार्ध, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा, रेकॉर्ड, परीक्षा गैरप्रकार चौकशी, पदवीप्रदान विभाग ), क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव